साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

HELLO NEWS

संपादक : विशाल वामन पाटील

* सातारा * वर्ष १ * अंक ६ * मराठी * सोमवार ६ जुलै ते १२ जुलै २०२६ * PRGI. MHMAR/26/A3624 * पाने ४ * किंमत ३ रुपये


* Satara * Year 1 * Volume 6 * Marathi * Monday 6 Jully to 12 Jully 2026 * PRGI. MHMAR/26/A3624 * Page 4 * Price 3 Rs.

# सातारा जिल्ह्यात पावसाची धुवाधार बॅटिंग

## कोयनेत २४ तासात अडीच टीएमसी पाणीसाठा वाढला : पुणे-बंगळूर महामार्गासह सेवा रस्त्यांवर पाणीच पाणी : : वाहतुकीचा खोळंबा, पेरणी, टोकणी व ऊस लागवडीच्या कामांना वेग

**कराड (हॅलो न्यूज)**

कोयना धरण परिसरात पावसाने धुवाधार हजेरी लावली असून जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पावसात सुरुवात झाली आहे. चार दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकरी सुखावला असून पेरणीला वेग आला आहे. प्रशासनाने रविवारी सातारा जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट दिल्याने काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. गेल्या २४ तासात कोयना धरणात २९ हजार क्यूसेस प्रति सेकंद पाण्याची आवक सुरू आहे. कोयना धरणात सध्या १९.११ टीएमसी पाणी साठा झाला आहे. गेल्या २४ तासात कोयना येथे ४२ मिलिमीटर, नवजा ५१ मिलीमिटर तर महाबळेश्वरला ६२ मिलिमीटर पाऊसाची नोंद झाली आहे. पाटण तालुक्यातील मोरणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या सातत्यपूर्ण पावसामुळे धरणाच्या पाणी साठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. मोरणा गुरेघर ०.८४ टीएमसी पाणीसाठा झाला आहे.



तर कराड तालुक्यातील कराड, मलकापूर शहरांसह संपूर्ण तालुक्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जनजीवनावर त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. एकीकडे कृष्णा आणि कोयना नद्यांच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली असून, दुसरीकडे ग्रामीण भागात खरीप हंगामातील शेतीकामांना वेग आला आहे. मात्र, शहरातील सखल भाग आणि आशियाई महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहनधारक व नागरिकांची मोठी गैरसोय झाली.

शनिवारी दिवसभर अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत राहिल्या. त्यामुळे कराड आणि मलकापूर शहरातील अनेक सखल भागांत पाणी साचले. विशेषतः आशियाई महामार्गाच्या दोन्ही बाजूंच्या सेवा रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने दुचाकी वाहनचालकांना जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागला. हलक्या चारचाकी वाहनधारकांनाही जलमय खड्ड्यांतून मार्ग काढताना कसरत करावी लागली.

नांदलापूर आणि पाचवड फाटा परिसरात ही समस्या अधिक तीव्र स्वरूपात दिसून आली. पाचवड फाटा येथे प्रत्येक पावसाळ्यात सेवा रस्त्यांवर पाणी साचण्याची समस्या निर्माण होत असतानाही संबंधित विभागाकडून कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने वाहनधारक आणि स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# वसंतगडच्या वि. ग. माने हायस्कूलच्या तीन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परिक्षेत यश

**कराड (हॅलो न्यूज)**

वसंतगड (ता. कराड) येथील श्री चंद्रसेन शिक्षण संस्थेच्या श्री. वि. ग. माने हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या तीन विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शिष्यवृत्ती प्राप्त केली.

कु. वेदिका नवनाथ सूर्यवंशी हिने गुणवत्ता यादीत कराड तालुक्यात ७ वा क्रमांक व सातारा जिल्ह्यात ५५ वा क्रमांक तर कु.प्रांजल निलेश चव्हाण हिने कराड तालुक्याच्या गुणवत्ता यादीत २१४ वा क्रमांक मिळवून शिष्यवृत्ती प्राप्त केली. तसेच निल सचिन जाधव इयत्ता ८ वी याची सैनिक स्कुल, सातारा येथे निवड तसेच त्याला इ. ८ वी स्कॉलरशिप परीक्षेत शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

त्यांच्या या यशाबद्दल श्री. चंद्रसेन शिक्षण संस्थेचे सचिव रघुनाथ नलवडे (दादा), उपाध्यक्ष महिपती कोकरे, हणमंतराव



नलवडे, चंद्रकांत पाटील, सरपंच अमित नलवडे, तानाजीराव वाघमारे, मुख्याध्यापक मंदार दीक्षित, पर्यवेक्षक शिवाजी पाटील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक इत्यादींनी अभिनंदन केले.

# सातारा जिल्हा पोलीस दलात अंतर्गत फेरबदल

## ४१ अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या, कराड ग्रामीणला शितलकुमार कोल्हाळ नवे पोलीस निरीक्षक

**सातारा (हॅलो न्यूज)**

सातारा जिल्हा पोलीस दलाच्या प्रशासकीय कामकाजात अधिक परिणामकारकता आणि समन्वय साधण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने अंतर्गत बदलीचा मोठा आदेश जारी केला आहे. जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २२(२) अंतर्गत एकूण ४१ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना मंजुरी देण्यात आली असून, या फेरबदलामुळे जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्यांना नवे प्रभारी अधिकारी मिळाले आहेत.


पोलीस निरीक्षक पदावरील बदल्यांमध्ये महेंद्र जगताप यांच्याकडे खंडाळा, धनश्याम बल्लाळ यांच्याकडे फलटण शहर, अरुण देवकर यांच्याकडे कोरेगाव, प्रदीप सूर्यवंशी यांच्याकडे वाई, शितलकुमार कोल्हाळ यांच्याकडे कराड तालुका, महेश इंगळे यांच्याकडे शिरवळ आणि हर्षद गालिंदे यांच्याकडे महाबळेश्वर पोलीस ठाण्याची धुरा सोपविण्यात आली आहे. बापूसाहेब सांडभोर यांची नियंत्रण कक्षात नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय काही सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षकांच्या बदल्यांनाही मंजुरी देण्यात आली असून, काही अधिकाऱ्यांना विद्यमान पदस्थापनेवर मुदतवाढ देण्यात आली आहे.

# अंधश्रध्दा कायद्यात महत्वाच्या बाबींचा समावेश असून त्यांचा जागर होणं गरजेचे

**विशाल पाटील (हॅलो न्यूज)**

अंधश्रध्दा कायद्यात काही महत्वाच्या बाबींचा समावेश असून त्यांचा जागर होणं गरजेचे आहे. लोकांना अंधश्रध्दा काय असतात, यांची माहिती नसल्यास ते अनावधनावाने करत असतात. तेव्हा या कायद्याचा जागर व्हावा. याकरिता कोणकोणत्या गोष्टीचा समावेश असतो. यावर जागर टाकूया. प्रत्येकाने या गोष्टीचे अवलोकन करावे, अन्यथा कायद्याच्या कचाटीत आपण सापडू शकतो.

प्रामुख्याने व्यक्तीला दोराने व साखळीने बांधून मारहाण करणे. काठीने व चाबकाने मारणे. तिला पादत्राने भिजवलेले पाणी प्यायला लावणे. मिरचीची धुरी देणे. त्या व्यक्तीला छताला टांगणे दोराला व केसाने बांधणे. केस उपटणे शरीरावर तापलेल्या वस्तूंचे चटके देऊन इजा पोहोचवणे. उघड्यावर लैंगिक कृत्य करणे जबरदस्ती करणे. त्या व्यक्तीवर अमानुष कृत्य करणे. त्या व्यक्तीच्या तोंडात जबरदस्तीने मूत्र किंवा



विष्टा घालणे किंवा यासारख्या कोणत्याही कृती एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्कारांचा प्रयोग प्रदर्शित करून त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे. अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार प्रसार करून लोकांना फसवणे थकवणे आणि त्यांच्यावर दहशत बसवणे. अलौकिक शक्तीची कृपा मिळवण्याच्या हेतूने आणि जीवाला धोका निर्माण होईल शरीराला जीव घेण्या जखम्या होतील, अशा अमानुष अघोरी आणि कनिष्ठ प्रथांचा अवलंब करणे. अवलंब करण्यास इतरांना प्रवृत्त करणे उत्तेजन देणे व सक्ती करणे मौल्यवान वस्तू गुप्तधन आणि जलस्त्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने व तत्सम कारणाने करणी भाणामती या नावाने कोणतेही अमानुष अनिष्ट अघोरी कृत्य किंवा जादूटोणा करणे जारणमारण व अन्य कारणाने नरबळी देणे, किंवा देण्याचा प्रयत्न करणे किंवा अशी अमानुष कृत्य करण्याचा सल्ला देणे.

(जागर..)

त्याकरता प्रवृत्त करणे व प्रोत्साहन देणे. आपल्या अंगात अतिंद्रिय शक्ती असल्याचं भासवून किंवा एखाद्या व्यक्तीत अशी शक्ती असल्याचा आभास निर्माण करून इतरांच्या मनात भीती निर्माण करणे किंवा तिचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होईल असं सांगणे. धमकी देणे, फसवणे, ठकवणे, एखादी व्यक्ती करणी जादूटोणा करते भूत लावते व मंत्रतंत्राने जनावरांचे दूध आठवते, असा समज निर्माण करणे. एखादी व्यक्ती अपशकुनी आहे. रोगरायला कारणीभूत आहे, असं भासवून तिला त्रास देणे एखादी व्यक्ती सैतान व सैतानाचा अवतार असल्याचं जाहीर करणे. जारण मारण करणी व चेटूक केल्याच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे. तिची नग्न अवस्थेत धिंड काढणं किंवा तिच्या रोजच्या व्यवहारांवर बंदी घालणं. मंत्राच्या मदतीने भूत पिशाचा आव्हान करणे व करण्याची धमकी देऊन एखाद्याच्या मनात भीती निर्माण करणे. एखाद्या व्यक्तीला झालेली शारीरिक इजा ही भूताचा व अतिंद्रिय शक्तीचा कोप असल्याचा समज करून देऊन वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखणे. त्याऐवजी अमानुष अनिष्ट अघोरी कृत्य व उपाय करायला प्रवृत्त करणे. कुत्रा, साप, विंचू चावल्यास एखाद्या व्यक्तीला उपचार घेण्यापासून रोखून किंवा प्रतिबंध करून त्याऐवजी मंत्रतंत्र किंवा यासारखे उपचार करणे बोटाने शस्त्रक्रिया करून दाखवतो, असा दावा करणे. गर्भवती स्त्रीच्या गर्भाचे लिंग बदलण्याचा दावा करणे. स्वतः अलौकिक शक्ती असल्याचा दावा करणे. कुणाचा अवतार असल्याचं व स्वतःचा आत्मा पवित्र असल्याचं भासवणे. मूल न होणाऱ्या स्त्रीला अलौकिक शक्तीद्वारे मूल होण्याचा आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणे. एखाद्या मानसिक विकलांग व्यक्तीमध्ये अमानवी शक्ती असल्याचं भासवून त्याद्वारे इतरांची लुबाडणूक करणे. (क्रमश...)

संपादकीय

# सत्तेचा हव्यास अन् ऑपरेशन

राज्यात गेल्या अनेक दशकांचे राजकारण हे सत्ताताधारी, विरोधक असे देशाने नव्हे जगाने पाहिले. परंतु, २०१९ नंतर केवळ सत्तेचा हव्यास अन् ऑपरेशन लोटस, ऑपरेशन टायगर अशा नावाने महाराष्ट्रात खेळ सुरू आहे. कर्नाटक, मध्यप्रदेश, गोवा, मणिपूर, अरूणाचल प्रदेशातही अशी ऑपरेशन झाली. सत्तेचा हव्यास एवढा हवा, हवा वाटू लागला आहे की भारतीय लोकशाहीत विरोधक उरतील का ही शंका उपस्थित होवू लागली आहे. काँग्रेस पक्ष विरोधक म्हणून रस्त्यावर उतरण्यास कमी पडत असल्याची टीका सत्ताधारी करत आहेतच, आता ती टीका सामान्याच्यातून होत असताना काँग्रेसने आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे. तर सत्ताधारी भाजपानेही सत्तेत किती लोकांना सामावून घ्यावे, यांचाही विचार करणे गरजेचे आहे. अन्यथा एक दिवस काँग्रेस नको म्हणून भाजपाला २०१४ साली लोकांनी स्विकारलं. तेच पुढे तुमच्याकडे सत्तेच्या हव्यासापोटी आलेल्याची संख्या पाहून ते नको पर्यायाने तुम्ही नको म्हणून जनतेला तिसरा पर्याय किंवा पुन्हा काँग्रेसला स्विकारावं लागेल, अशी परिस्थिती होवू शकते. तेव्हा सत्तेचा हव्यास असलेल्यांना ऑपरेशन नावाने पक्षात किती घ्यावे, यांचा विचार होणे गरजेचे बनले आहे.

महाराष्ट्रात २०२२ साली शिवसेनेतील मोठ्या बंडामुळे महाविकास आघाडीचे सरकार पडले. याला राजकीय वर्तुळात ऑपरेशन म्हटले गेले, ज्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजप-शिवसेना युतीचे सरकार सत्तेत आले. २०२४ साली राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही अशीच फूट पडून अजित पवार गट सत्तेत सहभागी झाला. मध्य प्रदेशातील सत्तांतर २०२० होवून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ज्योतिरादित्य शिंदे यांनी आपल्या समर्थक आमदारांसह भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे कमलनाथ यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकार अल्पमतात आले आणि भाजपचे शिवराजसिंह चौहान मुख्यमंत्री झाले. कर्नाटकात २०१९ ला काँग्रेस आणि जेडीएस (JDS) आघाडीच्या १७ आमदारांनी राजीनामा दिल्यामुळे सरकार कोसळले. त्यानंतर बी. एस. येडियुरप्पा यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार स्थापन झाले. गोवा, मणिपूर, आणि अरुणाचल प्रदेशाही गेल्या काही वर्षांत विरोधी पक्षातील आमदारांना इतर पक्षात सामील करून घेऊन सत्ता परिवर्तनाचे प्रयत्न झाले आहेत.

देशातील ऑपरेशन पॅटर्न असाच चालू राहिल्यास काँग्रेस पक्ष विरोधात राहील. परंतु, या काँग्रेसने आतातरी ग्राउंडवर कार्यकर्त्यांची फळी निर्माण करणे गरजेचे आहे. पक्ष, संघटना बांधणी केवळ जिल्हा पातळीवरून पुढे बांधली जात आहे. त्यामध्ये जुन्यानाच संधी दिली जात आहे. त्यामुळे नवी, तरूण पिढी बांधणी न झाल्यास विरोधी पक्ष केवळ नावापुरता राहील. काँग्रेसचे नेतृत्व राहूल गांधी करत असले तरी ते स्थानिक पातळीवर येवू शकत नाहीत. तेव्हा जिल्हा, तालुका पातळीवरील पदाधिकाऱ्यांच्या लक्षात केव्हा येणार. पक्ष नेतृत्व रस्त्यावर प्रत्येक ठिकाणी उतरणार असेल तर स्थानिक पातळीवरील नेतृत्वाचा काय उपयोग हा प्रश्न निर्माण होतो. प्रत्येक विषय, आशय मांडण्यासाठी जशी एक साखळी असते. तशीच राजकारणात देश, राज्य, विभाग, उपविभाग, जिल्हा, तालुका अशी साखळी निर्माण होणे गरजेचे असून ती सक्षमपणे चालली तरच लोकशाहीतील विरोधक जिवंत राहतील अन्यथा काळ माफ करणार नाही. सत्तेचा हव्यास लोकशाही नव्हे तर विरोधकही संपवतील.

# नाविण्यपूर्ण उपक्रमांद्वारे जादूटोणा विरोधी कायद्याची प्रचार, प्रसिद्धी करा : विभागीय आयुक्त शीतल तेली

**विशाल पाटील**
**सातारा (हॅलो न्यूज)**

जादूटोणा अंतर्गत गुन्ह्यांची संख्या कमी होत आहे, ही सकारात्मक बाब आहे. जुन्या चालीरिती, रुढी- परंपरा बदलणे हे कठीण काम आहे. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नाविण्यपूर्ण उपक्रमांद्वारे राबवून प्रचार, प्रसिद्धी करावी, अशा सूचना विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिल्या.




जादूटोणा विरोधी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी गठीत विभागीय समितीच्या आढावा बैठकीत श्रीमती तेली बोलत होत्या. यावेळी समितीच्या सदस्य सचिव तथा समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, पुणे जिल्ह्याचे सहायक आयुक्त विशाल लोंढे तसेच विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, आदिवासी विकास विभागाचे अतिरिक्त आयुक्त दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

श्रीमती तेली म्हणाल्या, या कायद्याची विविध स्पर्धांमधून जनजागृती करता येईल. विद्यार्थी हे संदेशवहनाचे काम चांगल्या प्रकारे करु शकतात, त्यामुळे शाळांमध्ये विशेषत: आदिवासी भागातील शाळांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करावेत. विविध भागांमधील गुन्ह्यांची मिमांसा करुन सेवाभावी संस्था, बिगर शासकीय संस्थांना सामील करुन घ्यावे. नियमानुसार जिल्हास्तरीय समित्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात यावे. या

(जागर..)

कायद्याशी संबंधित सर्व घटकांनी एकत्रितरित्या काम केल्यास कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होऊ शकेल. सर्व जिल्ह्यांनी प्राप्त निधीचा खर्च प्रचार-प्रसिद्धीच्या कामासाठी करावा, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत या कायद्यांतर्गत दाखल प्रकरणे, उपलब्ध अनुदान, गुन्हयांची संख्या आदी विषयांचा विभागीय आढावा घेण्यात आला

# शिकलेलेच अंधश्रद्धांना जास्त बळी पडतात

जटा वाढवणाऱ्या स्त्रियांच्या मध्ये भावनिक मानसिक दबाव येत असतो.देवी पावली जटा झाली अंगारा धुपारा केले जातात. कर्ज काढून देवधर्म केला अनेक महिलांच्या जटा सोडवत असताना हा प्रश्न आम्हाला नेहमीच येत असतो. या त्रासातून मुक्त झालेल्या महिलांचा चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा असतोपण ज्याचे जळते त्यालाच कळते कारण लहान वर्षभराच्या मुली पासून ते वयोवृद्ध महिलांच्या पर्यंत न विंचरलेल्या केसांमुळे आणि अस्वच्छतेमुळे जटा येत असतात. या केसात हळद-कुंकू, उंबराचा चिक, वडाचा चिकपूजेचा प्रसाद हा डोक्याला पुसणे यामुळे बुरशीची वाढ होते.त्या जटवीस तीस वर्षाच्या असतात वजनाने या आठ दहा किलोच्या पण असतात. जास्त वजनाच्या जटा बाळगल्याने जो काय मानसिक आणि शारीरिक त्रास होतो त्यातून मुक्त होण्यासाठी मानसिक आणि शारीरिक भीती संपवणे गरजेचे असते. तशातच अनेकींच्या डोक्यात प्रचंड प्रमाणात उवा आणि लिखा होतात. त्या रक्त शोषतात परिणामी अशा जटाधारी महिलांचे हिमोग्लोबिन कमी कमी होत जाते, सहज रोगाला बळी पडतात इतर त्रास थकवा, डोकेदुखी, मानदुखी पाठदुखी होत राहते पण याम्हीला देवाचे म्हणून शन करत राहतात. अशा अवस्थेत हजारो रुपये पाण्यात घालण्यासाठी सुद्धा या व्यक्ती तयार होतात. पण सरकारने यावर उपाययोजना आमलात आणली पाहिजे. संत तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व गाडगेबाबा यांनी अनेक वेळा याबद्दल सांगितले होते.अशा भोंदूगिरीला बळी पडू नका अशी अपेक्षा अनेकदा यांच्या कडून केलेले आपल्याला दिसून येते. पण शिकलेल्या लोकांना याचे देणे घेणे नसते.कांही जटाधारी महिलांच्या अंगात येते त्यांना प्रश्न विचारायला व समस्या सांगायला अनेक अशिक्षित व उच्च शिक्षित कुटुंबे जातात यावर काय बोलावे हे समजत नाही.

अशा लोकांना बुवा बाया यांची खूप वेड लागलेले दिसून येते. मोठमोठे संत महंत चमत्कार करतात त्यांचा भांडाफोड, पर्दाफार्श करण्याच्या ऐवजी देशातील अनेक बिनडोक राजकारणी अशा लोकांच्या नादाला लागतात. स्टिंग ऑपरेशन करून लोकांच्या पुढे या गोष्टी आणल्या तसच साधू बुवांचे पितळउघडे पाडले तरी एक बुवा जाऊन दुसरा बुवा तिथे निर्माण झालेला आपल्याला दिसतो. त्याच्याबद्दल बोलायचे धाडस ना पोलिसांना नापत्रकारांना कारण त्यांना कोणा गुंड, राजकीयव्यक्तींचे पाठबळ असते. जे अनेक बुवा पकडले गेलेले आपल्याला माहित आहेत त्यांचे अनैतिक वर्तन माहीत असूनही कुटुंबेच्या कुटुंबे बदनामी झालेल्या आपल्याला दिसून येतात.यासाठी आपण सर्वांनी अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याचे पालन करणे गरजेचे आहे. याबाबत सकरात्मक कार्य केले पाहिजे. जोपर्यंत युवक विद्यार्थी जगरुक होत नाही तोपर्यंत अनेक पिढ्या अशाच जात राहणार आणि फसवणाऱ्यांचे पिढ्या तंत्रज्ञानाचा आणि चमत्काराच्या नावाखाली लोकांचे लैंगिक, शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण करत राहणार तेव्हा आपण सावध राहणे गरजेचे आहे.

**- डॉ. सुधीर कुंभार ९४२१२१४१३६**
**विज्ञान प्रसारक, विद्यानगर कराड**

# गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉलसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सातारा, जिमाका**

महाराष्ट्र राज्यामध्ये चामडयाच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्तीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जाती प्रवर्गातील व्यक्ती कार्यरत असून, त्यांची उपजिविका ही चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्तीच्या क्षेत्रावर अवलंबून आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील पादत्राणे दुरुस्ती करणारे व्यावसायिक हे रस्त्याच्या कडेला उन्हातान्हात बसून आपली सेवा जनतेला देत असतात, या व्यावसायिकांना ऊन, वारा व पाऊस यांपासून संरक्षण मिळावे व त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी गटई कामगारांना १०० टक्के अनुदान या तत्वावर पत्र्याचे स्टॉल वर कमाल रु. ५०००/- इतके अनुदान देणे ही योजना राबविण्यात येते. तरी या योजनेचा जास्तीत जास्त गटई कामगारांनी लाभ घ्यावा.

विहित नमुन्यातील अर्ज संपूर्ण कागदपत्रांसह सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयात सादर करावे. सदर योजनेच्या अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण, सातारा कार्यालय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा येथे संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त सुनिल जाधव यांनी केले आहे.

# अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नव उदयोजक मार्जिन मनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**सातारा, जिमाका**

स्टँड अप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नव उदयोजक लाभार्थ्यांना मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत योजना सुरु करण्यात आली आहे.या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीसाठीच्या सवलती घेण्यास पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील नवउदयोजक यांनी १० टक्के स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित १५ टक्के राज्य शासनामार्फत देण्यात येते.

सदर योजनेचा लाभ अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नव उदयोजकांनी घ्यावा असे आवाहन श्री. सुनिल जाधव, सहायक आयुक्त, समाज कल्याण, सातारा यांनी केले आहे. संपर्कासाठी पत्ता सहायक आयुक्त, समाज कल्याण, सातारा कार्यालय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा येथे संपर्क साधावा.

* Satara * Vol- 6 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# ए. आय.द्वारे ऊस उत्पादनवाढीसाठी शासनाने राज्यात प्रायोगिक प्रकल्प राबवावा

## आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांची विधानसभेत मागणी; कृषिमंत्री सकारात्मक

कराड (हॅलो न्यूज)

राज्यातील ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी ए. आय. तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे गरजेचे आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, सहकारी साखर कारखाने आणि शेतकरी यांना एकत्र घेऊन कृषी विभागाने राज्यात प्रायोगिक प्रकल्प राबवावा, असा प्रस्ताव आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी आज विधानसभेत मांडला. याबाबत कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, लवकरच याप्रश्नी संयुक्त बैठक आयोजित करण्याची ग्वाही दिली.

पावसाळी अधिवेशनात राज्याच्या कृषी विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी विधानसभेत शेतकरी हिताचा महत्त्वपूर्ण मुद्दा उपस्थित करत सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. ते म्हणाले, जगभरात कृषी क्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वेगाने वापर वाढत असून, ए. आय. आधारित तंत्रज्ञानामुळे शेती उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. महाराष्ट्राच्या अर्थकारणात महत्त्वाची भूमिका असलेल्या ऊस पिकासाठी हे



तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार असून, यासाठी महाराष्ट्र शासन, सहकारी साखर कारखाने आणि शेतकरी यांना एकत्र घेऊन राज्यात प्रायोगिक प्रकल्प राबवण्यात यावा. या प्रकल्पामुळे उसाचे उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने राज्यात एक नवा प्रयोग होईल आणि त्याचा थेट फायदा लाखो शेतकऱ्यांना मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावर उत्तर देताना कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, कृषी विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना अनेक सदस्यांनी विविध सूचना मांडल्या असून, त्या सर्व मुद्द्यांवर कृषी विभाग गांभीर्याने काम करणार आहे. आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी मांडलेल्या ए. आय. आधारित ऊस उत्पादन वाढीच्या प्रस्तावाची दखल घेत, ऊस पिकामध्ये नवीन संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि ए.आय.चा वापर यासंदर्भात शासन सकारात्मक असून, या विषयावर लवकरात लवकर बैठक आयोजित केली जाईल.

या चर्चेमुळे महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याच्या दृष्टीने नवे पाऊल पडण्याची शक्यता निर्माण झाली असून, भविष्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरेल, असे मत अभ्यासकांकडून व्यक्त केली जात आहे.



# प्राना फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्राची पाटील यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकीने साजरा

## मुलांना शालेय साहित्य, रूग्णांना फळे वाटप

पाटण (हॅलो न्यूज)

ढेबेवाडी (ता. पाटण) येथील प्राना फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौ. प्राचीताई नरेंद्र पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त डोंगर दऱ्यातील जिल्हा परिषद शाळांमधील मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच ढेबेवाडी येथील ग्रामीण रूग्णालयात रूग्णांना फळे वाटप करण्यात आले. तसेच डॉ. प्राचीताई पाटील यांनी जिल्हा परिषद शाळांतील मुलांसोबत केक कापून आपला वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा केला.

यावेळी शुभदा पाटील, साधना कोळेकर, उज्वला पाटील, सपना पाटील, आशा सदामत, सीमा गोसावी, सुवर्णा मराठे, स्वाती उंडे, वैशाली मराठे, जयश्री पाचपुते, कमल पाटील, मालन पाटील, शारदा कदम यांच्यासह शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच ग्रामीण रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

ढेबेवाडी भागातील यादववाडी, शेंडेवाडी, जौंजाळवाडी, आंब्रुळवाडी, शितपवाडी, मुंद्रुळकोळे, साबळेवाडी, जाधववाडी, पानवळवाडी, उमरकांचन, भांबुचीवाडी, सावंतवाडी, जिंती, शिंगमोडेवाडी, सुतारवाडी, मराठवाडी या गावातील जिल्हा परिषद शाळांतील मुलांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.



# सह्याद्रि कारखान्याचे सभासद पुणे येथे ज्ञानयाग प्रशिक्षणासाठी रवाना

कराड (हॅलो न्यूज)

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी बु., पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या ज्ञानयाग प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद रवाना झाले.

कारखान्याच्या ऊस उत्पादक सभासदांना आधुनिक ऊस शेती, उत्पादनवाढ, नवीन तंत्रज्ञान तसेच साखर उद्योगातील बदलांची माहिती मिळावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षणासाठी राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री तथा सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. श्री. बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सभासदांचा प्रशिक्षण दौरा आयोजित करण्यात आला आहे.

प्रशिक्षणातून मिळणारे ज्ञान प्रत्यक्ष शेतीत वापरून ऊस उत्पादन, गुणवत्ता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश असून, या प्रशिक्षणामध्ये ऊस लागवडीतील आधुनिक तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, खतांचा संतुलित वापर, रोग व कीड नियंत्रण, तसेच साखर उद्योगातील नव्या घडामोडींविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याप्रसंगी जयेंद्र नाईक, सुजय पवार, भास्कर कुंभार, बटोळे, वसंतराव चव्हाण, संजय चव्हाण, सुरज घार्गे डॉ. पवार, हिंदुराव यादव, संग्राम यादव यांचेसह कारखान्याचे सभासद, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# करवडीत प्राकृतिक शेती कार्यशाळा, रामकृष्ण वेताळांचे मार्गदर्शन

ओगलेवाडी (हॅलो न्यूज)

भाजपा किसान मोर्चा, सातारा जिल्ह्याच्या वतीने करवडी येथे आयोजित प्राकृतिक शेती कार्यशाळेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्यासह कृषी तज्ञ विजय वरुडकर, जगन्नाथ मगर, शशिकांत क्षीरसागर, खुशलचंद मोरे, डॉ. भरत खांडेकर, डॉ. दिलीप धोंगडे आणि डॉ. विशाल महाजन यांनी शेतकऱ्यांना आधुनिक व प्राकृतिक शेतीच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीसाठी प्राकृतिक शेतीचा स्वीकार हाच भविष्यातील प्रभावी पर्याय असल्याचा सूर यावेळी सर्वच मान्यवरांच्या मार्गदर्शनातून उमटला.

भाजपा किसान मोर्चाचे सातारा जिल्हाध्यक्ष सूर्यकांत पडवळ यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यशाळेस संजय घोरपडे, शंकरराव शेजवळ, विकास गायकवाड, नवीन जगदाळे, जयसिंग डांगे, नम्रता कुलकर्णी, प्रशांत भोसले, बाळासाहेब पोळ, रुक्मिणी जाधव, उषाताई नलवडे, रामराव भोसले, अश्विनी पळसे, शशिकांत डुबल, संजय पिसाळ, संजय घार्गे, सचिन नांगरे, राहुल यादव, दीपक इंगवले, शहाजी मोहिते, रघुनाथ शेडगे यांच्यासह परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.



**प्राकृतिक शेतीपासून मिळणारे प्रमुख फायदे**

जमिनीची सुपीकता वाढते
उत्पादन खर्चात बचत होते
विषमुक्त व दर्जेदार अन्नधान्य
पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन
हवामान बदलाशी सामना करण्याची क्षमता.
शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध.

# कराड नगरपरिषदेला २ कोटी रुपयांची अत्याधुनिक स्वच्छता व अग्निशमन वाहने

## लोकनियुक्त नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांच्या पाठपुराव्याला यश

कराड (हॅलो न्यूज)

कराड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले लोकनियुक्त नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तसेच शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कराड नगरपरिषदेला सुमारे २ कोटी रुपयांची अत्याधुनिक स्वच्छता व अग्निशमन वाहने प्राप्त झाली आहेत. कराड शहराच्या नागरी सुविधा अधिक सक्षम, आधुनिक आणि कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपलब्धी असून, शहराच्या विकासात मोलाची भर घालणारी ठरणार आहे.

सक्शन कम जेटिंग मशीन (स्वच्छ भारत अभियान अंतर्गत)

कराड नगरपरिषदेला स्वच्छ भारत अभियानांतर्गत अंदाजे १ कोटी रुपये किंमतीची अत्याधुनिक सक्शन कम जेटिंग मशीन प्राप्त झाली आहे. या वाहनाची एकूण क्षमता ८ हजार लिटर असून त्यामध्ये ४ हजार लिटर सक्शन व ४ हजार लिटर जेटिंग क्षमता आहे. ही मशीन गटारे, भूमिगत गटार (Sewer Line), मॅनहोल तसेच सांडपाणी वाहिन्यांमधील गाळ, कचरा व अडथळे यांत्रिक पद्धतीने प्रभावीरीत्या दूर करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. या आधुनिक यंत्रणेमुळे शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक गतिमान, सुरक्षित आणि कार्यक्षम होणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या स्वच्छता सुविधा उपलब्ध होतील.

Force Gurkha 4x4 Mini Fire Tender (नगर प्रशासन संचालनालय – DMA मार्फत)

कराड नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागास महाराष्ट्र शासनाच्या नगर प्रशासन संचालनालय (DMA) मार्फत अंदाजे ९८ लाख रुपये किंमतीचे Force Gurkha 4x4 Mini Fire Tender उपलब्ध झाले आहे. हे अत्याधुनिक वाहन शहरातील अरुंद रस्ते, ग्रामीण भाग, औद्योगिक क्षेत्र तसेच आपत्कालीन अग्निशमन व बचाव कार्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या वाहनामध्ये ३०० लिटर पाणी साठवण क्षमता, ३० लिटर फोम क्षमता, अत्याधुनिक Rescue Tools तसेच First Aid Box उपलब्ध असून, आग विझविण्याबरोबरच बचाव कार्य अधिक जलद आणि प्रभावीपणे पार पाडणे शक्य होणार आहे. यामुळे कराड नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाची आपत्कालीन प्रतिसाद क्षमता लक्षणीयरीत्या वाढणार आहे.



# कोटा अकॅडमीचा शालेय स्तरापासून स्पर्धा परीक्षांची तयारी उपक्रम उत्तम : माजी खासदार श्रीनिवास पाटील

**कराड (हॅलो न्यूज)**

विद्यार्थ्यांनी सातवी पासूनच यूपीएससी, एमपीएससी, सीजीएल सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याचा कोटा अकॅडमीचा (Kota Academy) आयएएस (IAS) फाउंडेशन हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे असे प्रतिपादन सिक्कीमचे माजी राज्यपाल, कराडचे माजी खासदार व माजी सनदी अधिकारी श्रीनिवास पाटील यांनी केले.

कोटा अकॅडमीच्या आयएएस फाउंडेशन या कोर्सच्या माहिती पत्रकाच्या अनावरण प्रसंगी त्यांनी असे सांगून कराड व परिसरातील शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले. यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांना इयत्ता सातवी ते अकरावी चा अभ्यासक्रम असतो. त्याची तयारी आत्तापासून केली तर विद्यार्थ्यांना त्याचा निश्चितच लाभ होईल असे ते यावेळी म्हणाले.



विविध शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना या उपक्रमाची माहिती द्यावी, असे त्यांनी यावेळी मैथिली खुस्पे यांना सांगितले. गेली २० वर्षे कोटा अकॅडमी कराड मध्ये कार्यरत असून त्यांनी अनेक डॉक्टर्स व इंजिनिअर्स घडवलेत. यासाठी त्यांनी कोटा अकॅडमीचे अभिनंदन केले. या उपक्रमास त्यांनी शुभेच्छा दिल्या व उपस्थित असलेल्या कोटा अकॅडमीच्या डॉ. महेश खुस्पे, सौ. मंजिरी खुस्पे, कु. मैथिली खुस्पे यांचे या सुंदर उपक्रमाबद्दल अभिनंदन केले. कराड मधून भारताचे भवितव्य घडवणारे उत्तम अधिकारी बनतील, अशी आशा माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांनी व्यक्त केली.




# कराड उत्तरच्या रस्त्यासाठी ४२५ कोटींचा विकासनिधी मंजूर

## कोरेगाव ते कराड तालुक्यातील या रस्त्याचे होणार क्राँक्रीट

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या विकासाला मोठी गती मिळाली आहे. पुसेसावळी-गोरेगाव ते सातारा जिल्हा हद्द व बनवडी फाटा-ओगलेवाडी-टेंभू-कोरेगाव या महत्त्वाच्या रस्त्याला काँक्रीटीकरणासाठी तब्बल १३९ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे.



आमदार मनोज घोरपडे यांच्या पाठपुरावा यश आले आहे. कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे आमदार अतुलबाबा भोसले यांच्या सहकार्याने या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

या मार्गावरील प्रवास सुखकर होणार असून या काँक्रीट रस्त्यामुळे वेळेची बचत होणार आहे. तसेच अपघाताचे प्रमाणही कमी होण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील कृषी माल बाजारपेठेपर्यंत जलद पोहोचल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होणार आहे. तसेच पर्यटकांचा ओघ वाढल्याने स्थानिक व्यवसायांनाही चालना मिळणार असल्याचे आ. घोरपडे यांनी सांगितले.

**कराड उत्तरच्या प्रगतीसाठी महायुती सरकार कटिबद्ध**

राज्य शासनाच्या माध्यमातून रहिमतपूर- कराड रस्त्यासाठी २८६ कोटीचा निधी उपलब्ध झाला होता. त्यातील १३९ कोटीचा निधी उपलब्ध झालेला आहे. कराड उत्तरच्या रस्त्यांसाठी एकूण ४२५ कोटीचा भरघोस निधी मिळालेला आहे. येणाऱ्या कालावधीमध्ये हॅमच्या माध्यमातून मतदार संघातील चार ते पाच मोठे रस्ते मंजूर करण्यात येणार आहेत.

**- आमदार मनोजदादा घोरपडे, कराड उत्तर विधानसभा मतदारसंघ**

# थायलंडमध्ये आशियाई कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्राच्या अंजली वेताळला कास्यपदक

**सातारा (हॅलो न्यूज)**

थायलंड येथे झालेल्या १५ वर्षांखालील आशियाई अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत सुर्ली (ता. कराड) अंजली संतोष वेताळ हिने जिगरबाज कामगिरीचे प्रदर्शन करीत कांस्यपदक मिळवून आंतरराष्ट्रीय पातळीवर सुर्लीचा झेंडा फडकावला.लेकीच्या दमदार कामगिरीमुळे ग्रामस्थांनी जल्लोष केला.

६२ किलो वजनगटात कांस्यपदकासाठी भारताची अंजली वेताळ आणि मंगोलियाच्या खोन्झोरुल ओचीर यांच्यात अटीतटीची लढत झाली. अंजलीने बलाढ्य प्रतिस्पर्धी खोन्झोरुलला सुरवातीपासून डोईजड होऊ दिले नाही. सलामीपासून आक्रमक खेळ करीत तीने गुणफलक हलता ठेवून मोठी आघाडी घेतली होती. चुरशीची लढत १५ विरूद्ध २ गुण मिळवून तांत्रिक गुणाधिक्याने जिंकली.आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवून तीने सातासमुद्रापार झेंडा फडकला.

ती सध्या मुरगुड जिल्हा कोल्हापूर येथे लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय (SAI) कुस्ती संकुलात प्रशिक्षक दादासाहेब लवटे, दयानंद खतकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.




**अंजलीचे ६२ किलो वजनी गटात यश**

तिच्या यशाबद्दल माजी खासदार संजय दादा मंडलिक, कार्याध्यक्ष ॲड. विरेंद्र भैय्या मंडलिक साईचे माजी राज्य समन्वयक चंद्रकांत चव्हाण, हिंदकेसरी संतोषआबा वेताळ, सुर्ली ग्रामस्थांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे.

१५ वर्षाखालील संघाने स्पर्धेत अतिशय चांगली कामगिरी केली.

# ‘कृष्णा’ देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ : डॉ. अभिजात शेठ

## कृष्णा विद्यापीठाचा दिक्षांत सोहळा उत्साहात संपन्न

**कराड (हॅलो न्यूज)**

आरोग्य क्षेत्रातील प्रत्येकाने ज्ञान, चिकित्सक विचार, नैतिकता आणि जागतिक जबाबदारी या सर्व गुणांनी सज्ज असणे आवश्यक आहे. यासाठी भविष्यातील वैद्यकीय शिक्षण हे अधिकाधिक विद्यार्थीकेंद्रित, समाजाभिमुख व जागतिक दृष्टीकोन बाळगणारे असले पाहिजे, असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनी केले. कृष्णा विश्व विद्यापीठाच्या १४ व्या दिक्षांत सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलपती डॉ. सुरेश भोसले होते.

कृष्णा विद्यापीठाच्या प्रांगणात खास उभारलेल्या शामियानात हा दिक्षांत सोहळा उत्साहात संपन्न झाला. पोलिस बॅन्ड पथकाच्या मानवंदनेत प्रमुख पाहुण्यांना समारंभस्थळी नेण्यात आले. व्यासपीठावर विद्यापीठाचे प्रधान सल्लागार डॉ. वेदप्रकाश मिश्रा, डॉ. प्रवीण शिनगारे, कुलगुरू डॉ. नीलम मिश्रा, कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. विनायक भोसले, डॉ. हरी वासुदेवन, दिलीप पाटील, कार्यकारी संचालक पी. डी. जॉन, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्योत्स्ना पाटील, कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते.



या सोहळ्यात विद्यापीठातील विविध अधिविभागातील ९७२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये ३३ विद्यार्थ्यांना कुलपती डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. तर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विविध अधिविभागात सर्वोत्कृष्ट ठरलेल्या २६ विद्यार्थ्यांना विशेष पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

अध्यक्षस्थानावरुन बोलताना कुलपती डॉ. सुरेश भोसले म्हणाले, पारंपरिक शिक्षणपद्धती आता मागे पडत असून, समुदायाभिमुख शिक्षणपद्धतीला महत्त्व प्राप्त झाले आहे. कृष्णा विद्यापीठ संशोधनाभिमुख आणि नवोन्मेषाला चालना देणारी संस्था म्हणून विकसित होत आहे. नव्या वैज्ञानिक ज्ञाननिर्मितीवर आमचा भर आहे. यंदा विद्यापीठांतर्गत व बाह्य संशोधनात मोठी वाढ झाली असून, यावर्षी पेटंट्सची संख्याही वाढली आहे. आज वैद्यकीय शिक्षण अतिशय वेगाने बदलत असून, संपूर्ण शैक्षणिक व्यवस्था संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. अशावेळी आपण एक असे मॉडेल विकसित करत आहोत, जे केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील वैद्यकीय शिक्षणासाठी आदर्श ठरेल.

**‘कृष्णा’ देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ**

कृष्णा विश्व विद्यापीठ हे सर्वोत्कृष्ट पायाभूत सुविधा असलेले देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ आहे. तसेच या विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले हे एक उत्कृष्ट डॉक्टर आहेतच; पण त्यासोबतच प्रत्येक बाबींकडे बारकाईने लक्ष देणारे, परिपूर्णतेचा ध्यास घेतलेले एक दूरदर्शी नेते आहेत, असे गौरवोद्गार राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनी आपल्या भाषणात काढले. याला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

कुलगुरू डॉ. नीलम मिश्रा यांनी कृष्णा विश्व विद्यापीठाच्या गेल्या वर्षातील प्रगतीचा आढावा घेत, विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक केले.

कार्यक्रमाला सौ. उत्तरा भोसले, माजी आमदार आनंदराव पाटील, मलकापूरचे नगराध्यक्ष तेजस सोनावले, उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे, कराडचे नगरसेवक सुहास जगताप, जयवंत पाटील, शिवाजी पवार, कृष्णा कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक जगदीश जगताप, बाबासो शिंदे, बी. एन. थोरात, आनंदा खबाले, सत्यजीत पाटील, लिंबाजी पाटील, जे. डी. मोरे, अविनाश खरात, सुनील पाटील, संभाजी पाटील, शिवाजीराव थोरात, कृष्णा विद्यापीठाच्या संशोधन संचालिका निवृत्त ब्रिगेडियर डॉ. जी. हिमाश्री, डॉ. डी. के. अगरवाल, कृष्णा वैद्यकीय विज्ञानच्या अधिष्ठाता डॉ. युगंतरा कदम, दंतविज्ञानचे अधिष्ठाता डॉ. शशिकिरण एन. डी., फिजिओथेरपीचे अधिष्ठाता डॉ. जी. वरदराजुलु, नर्सिंगच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली मोहिते, सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजीचे अधिष्ठाता डॉ. गिरीश पठाडे, फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. एन. आर. जाधव, डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. रेणुका पवार, डॉ. टी. पूविष्णू देवी, डॉ. नूतन पोदार, डॉ. स्नेहल मसूरकर, डॉ. अक्षदा कोपर्डे, कृष्णा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. विजय कणसे, डॉ. एस. आर. पाटील, डॉ. सत्यजीत पवार, डॉ. जयश्री ननावरे यांच्यासह विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य व विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, पालक, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.